| | |
|---|---|
| MHND200002672026 | **दि.कि.अर्ज क्र. ४९/२०२६**<br>**आरीफ बाणानी +५** वि**.** निरंक |

**मा. दिवाणी न्यायालय क–स्तर, माहूर जि. नांदेड यांचे न्यायालयात**

(पिठासिन अधिकारी **श्री. बी. ए. अग्रवाल** यांचे समोर)

१. आरीफ हमीद बाणानी
वयः ५५, धंदाः व्यापार,

२. मोहम्मद इद्रीस हमीद बाणानी
वयः ५३, धंदाः व्यापार,

३. अनीस हमीद बाणानी
वयः ५१, धंदाः व्यापार,

४. अस्लम हमीद बाणानी
वयः ४९, धंदाः व्यापार,

५. फरजाना रफीक घनीवाला
वयः ५७, धंदाः घरकाम,

६. शामीनबानो अन्सार घानावाला
वयः ५२, धंदाः घरकाम,

क्र.१ व ५ रा.वाई बा. ता. माहूर जि. नांदेड
क्र.२, ३ व ४ रा. सारखणी ता. किनवट जि. नांदेड
क्र.६ रा. सीहोरा ता. तुमसर जि. भंडारा -----**अर्जदार**

**विरूद्ध**

निरंक -----**गैरअर्जदार**

**अर्जः भारतीय वारस कायदा १९२५ चे कलम ३७२ नुसार.**

---

अर्जदारातर्फे विधिज्ञ- श्री. सी. एम. राठोड

---

**दि.कि.अर्ज क्र.४९/२०२६**

**आरीफ बाणानी +५** वि**.** निरंक

**<u>निशाणी क्र.१ खालील आदेश</u>**

**<u>(आदेश दिनांक– ११/०६/२०२६)</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने भारतीय वारसा कायदा १९२५ चे कलम ३७२ नुसार मयत अब्दुल हमीद हाजी मोहम्मद बाणानी यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्र मिळावे, यासाठी दाखल केला आहे.

**<u>अर्जदाराचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे</u> :**

२. अर्जदार हे मयत अब्दुल हमीद हाजी मोहम्मद बाणानी याचे वारस आहेत. मयत अब्दुल हमीद हाजी मोहम्मद बाणानी हे अर्जदार क्र.१ ते ६ यांचे वडील होते. मयत अब्दुल हमीद हाजी मोहम्मद बाणानी यांचा मृत्यू दिनांक ०६/०१/२०२६ रोजी झाला. मयत अब्दुल हमीद हाजी मोहम्मद बाणानी हयांचे महाराष्ट्र ग्रामीण बँक वाई ता. माहूर जि. नांदेड येथे खाते क्र.५४१५२०३०४८४ असे होते. त्या खात्यात रक्कम रु.३,४७,०७८/– शिल्लक होते. मयताच्या निधनानंतर त्याच्या नावे उपरोक्त खात्यात नमूद रक्कम मिळवण्यास अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशीर वारसदार किंवा हक्कदार नाहीत. त्यामुळे अर्जदाराने मयताचे कायदेशीर वारस असल्यामुळे वारस दाखला मिळावा, अशी विनंती केली.

३. अर्जाच्या अनुषंगाने जाहीर प्रगटन ''दैनिक गाववाला'' या वृतपत्रात दिनांक ०९/०४/२०२६ रोजी **(निशाणी क्र.१२)** प्रसिध्द करण्यात आले. परंतु, अर्जदाराच्या अर्जास कोणीही आक्षेप घेतलेला नाही अगर अर्ज नाकारलेला नाही. सबब, अर्ज हा विनाहरकत चालविण्यात आला.

४. अर्जदार क्र.३ अनीस हमीद बाणानी याने अर्जाच्या पृष्टयर्थ त्याची साक्ष **(निशाणी क्र.०९)** वर नोंदविली. अर्जदाराची साक्ष अबाधित राहीली व त्यास कोणीही हरकत घेतली नाही. अभिलेखावर **(निशाणी क्र.१३)** वर सादर केलेल्या मृत्यपत्रातुन मयत अब्दुल हमीद हाजी मोहम्मद बाणानी ही दिनांक ०६/०१/२०२६ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदार हेच मयताचे वारस असल्याचे दिसून येते.

५. मयताच्या उपरोक्त बँक खात्याचा उतारा **(निशाणी क्र.२१)** वर सादर करण्यात आला. सदर उता–यावरून असे निदर्शनास येते की, मयत अब्दुल हमीद हाजी मोहम्मद बाणानी यांच्या नावे असलेल्या खात्यामध्ये रक्कम ३,४७,०७८/– रूपये शिल्लक आहेत. मयताच्या मृत्यूनंतर बँकेत त्याच्या नावे असलेली रक्कम कायदेशीर वारस या नात्याने अर्जदाराला मिळणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने अर्जदाराला वारसा प्रमाणपत्र देणे न्यायसंगत आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) मयत अब्दुल हमीद हाजी मोहम्मद बाणानी यांचे महाराष्ट्र ग्रामीण बँक वाई ता. माहूर जि. नांदेड या शाखेत खाते क्र.५४१५२०३०४८४ असे होते. त्या खात्यात रक्कम रु.३,४७,०७८ /– मिळणेसाठी अर्जदार हेच मयताचे वारस आहेत. करीता, अर्जदाराला वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येते. त्यासाठी अर्जदाराने आवश्यक न्याया लयीन शुल्क द्यावी.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by BHOOMIT ASHOK AGRAWAL
Date: 2026.06.11 15:34:07 +0530

(बी.ए. अग्रवाल)

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, माहूर

जि. नांदेड

ठिकाण : माहूर

दिनांक : ११/०६/२०२६.

**दि.कि.अर्ज क्र.४९/२०२६**

**आरीफ बाणानी +५** वि**.** निरंक

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द नि शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | श्रीमती रू.बी.मस्के |
| न्यायालयाचे नाव | : | दिवाणी न्यायाधीश क. स्तर, माहूर |
| न्यायनिर्णय घोषित दिनांक | : | ११/०६/२०२६. |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी | | |
| यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | : | ११/०६/२०२६. |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक: | | ११/०६/२०२६. |